# प्रेस नोट

जळगाव पोलीस
दिनांक :०९/१०/२०२५

प्रति,

संपादक,

..................................

**विषय :- जळगाव शहरात अचानक कॉम्बींग ऑपरेशन राबविल्याबाबत..**

आगामी सण-उत्सव व स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या अनुषंगाने मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक,जळगाव यांनी जळगाव शहराते दि.०९/१०/२०२५ रोजी सकाळी ०४.०० ते ०८.०० वाजे पावेतो अचानक कॉम्बींग ऑपरेशन राबवून जळगाव शहरातील रेकॉर्ड वरील एकुण ३९४ आरोपी चेक करण्याबाबत अधिनस्त अधिकारी व पोलीस अंमलदार यांना आदेशित केले होते.

त्याप्रमाणे कॉम्बींग ऑपरेशन कामी नेमलेले पोलीस अधिकारी व अंमलदार असे जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे जमल्यानंतर जळगाव शहरात

१) एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत रामेश्वर कॉलनी, मास्टर कॉलनी, कासमवाडी, तुकारामवाडी, तांबापुरा, कंजरवाडा इत्यादी ठिकाणी कॉम्बींग केली.

२) शनिपेठ पोलीस स्टेशन हद्दीत कांचननगर, विठ्ठलपेठ, डॉ.आंबेडकर नगर, गोपाळपुरा, कोळीपेठ, मेस्कोमातानगर, गुरुनानक नगर, शनिपेठ गवळीवाडा, ज्ञानदेव नगर, दाळफळ, तळेले कॉलनी, शंकर अप्पा नगर इत्यादी ठिकाणी कॉम्बींग केली.

३) जळगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीत शिवाजी नगर, गेंदालाल मिल, राजमालती नगर, शाहुनगर इत्यादी ठिकाणी कॉम्बींग केली.

४) रामानंदनगर पोलीस स्टेशन हद्दीत राजीव गांधी नगर, समतानगर, महाबळ, पिंप्राळा हुडको, आझादनगर, खंडेराव नरग, पिंप्राळा, हरिविठ्ठल नगर इत्यादी ठिकाणी कॉम्बींग केली.

सदर कॉम्बींग ऑपरेशन मध्ये एकुण २७६ रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेक केले असता त्यात ८४ आरोपी मिळून आल्याने त्यांना शांतता राखण्याबाबत समज देवून सोडण्यात आले आहे.

वरील मिळून आलेल्या आरोपी पैकी जळगाव शहर पो.स्टे. रेकॉर्ड वरील हद्दपार ०२ हद्दपार आरोपी मिळून आले त्यांचेवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ सह ०१ आरोपीवर आर्म ॲक्ट कलम ४/२५ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहेत. एमआयडीसी पो.स्टे. रेकॉर्ड वरील हद्दपार ०१ आरोपी मिळून आल्याने त्यांचेवर आर्म ॲक्ट कलम ४/२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहेत. तसेच NBW वॉरंट मधील एकुण ०७ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. तसेच भुसावळ रेल्वेच्या गुन्हयांतील ०१ पाहिजे आरोपी मिळून आला असून त्यास भुसावळ रेल्वे पोलीस स्टेशनला ट्रान्सफर करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे कॉम्बींग ऑपरेशन मध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | केलेली कारवाई | आरोपी संख्या |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ | ०१ |
| ०२ | आर्म ॲक्ट कलम ४/२५, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ | ०२ |
| ०३ | NBW वॉरंट | ०७ |
| ०४ | गुन्हयांत पाहिजे आरोपी | ०१ |

मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्री.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक,जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली कॉम्बींग ऑपरेशन राबविण्यासाठी जळगाव शहरातील मा.श्री.नितीन गणापुरे,उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव उपविभाग, ०७ पोलीस निरीक्षक, १५ पोलीस अधिकारी, ३१४ पोलीस अंमलदार असे पोलीस अधिकारी व अंमलदार हे कॉम्बींग ऑपरेशन कारवाईसाठी नियुक्त केले होते.

यापुढे सुध्दा जळगाव जिल्हयांत अचानकपणे कॉम्बींग ऑपरेशन राबविण्याचे नियोजित असून जे रेकॉर्ड वरील गुन्हेगार टोळी करुन एकमेंका विरोधात सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट करतील त्यावर पोलीसांच्या सायबर विभागाची करडी नजर आहे. अशा प्रकारे गँगवार करणाऱ्या किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा पोहचविणाऱ्या आरोपीतांवर कठोर करवाई करण्यात येईल.

जनसंपर्क अधिकारी,
जळगाव पोलीस



